# अधिसुचना १९

उपविभागीय अधिकारी,करवीर
उपविभाग,कोल्हापूर कार्यालय
दि. /०८/२०१९
०३/०९/२०१९

भुमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३.

क्रमांक भूसंपादन /एसआर-०४/२०१७/ ज्याअर्थी, समुचित शासन असलेल्या कोल्हापूर जिल्हयाच्या जिल्हाधिकारी यांचे मार्फत उपविभागीय अधिकारी करवीर विभाग कोल्हापूर यांनी भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकता हक्क अधिनियम , २०१३ (२०१३ चा ३०) (यात यापुढे ज्याचा निर्देश उक्त व अधिनियम छ असा केला आहे.) यांच्या कलम ११ च्या पोट-कलम (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन अधिसूचना, क्रमांक ११, महाराष्ट्र शासन राजपत्र भाग एक, पुणे विभागीय पुरवणी मध्ये १३ जून २०१९ ते १९ जून २०१९ रोजी पृष्ठ १४ ते १६अन्वये प्रारंभिक अधिसूचना काढली आहे. त्याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, यासोबत जोडलेल्या अनुसूची एकमध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेल्या जमिनीची, अनुसूची दोनमध्ये अधिक तपशीलवार विनिर्दिष्ट केलेल्या सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे किंवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे, तसेच ज्याअर्थी, जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांनी दिनांक ०३ मे, २०१९ रोजी कलम ११ च्या अधिसूचनेस मान्यता प्रदान केलेली आहे.

आणि ज्याअर्थी, उपविभागीय अधिकारी, करवीर विभाग, कोल्हापूर यांचेकडे कलम १५ च्या पोट-कलम (२) अन्वये कोणत्याही खातेदारांनी आक्षेप नोंदविलेला नाही. उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमीन संपादित करण्याची आवश्यकता आहे याबाबत त्याची खात्री पटली आहे आणि म्हणून उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमिनीची आवश्यकता आहे असे याद्वारे घोषित करण्यात येत आहे.

आणि त्या अर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (छ) अन्वये, समुचित शासन असलेले जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमान्वये जिल्हाधिकाऱ्यांची कार्ये पारपाडण्यासाठी उपविभागीय अधिकारी, करवीर विभाग, जिल्हा कोल्हापूर यास (अधिसूचना काढण्यापूर्वी अधिकाऱ्यांचे नाव पत्ता नमूद करावा) पदनिर्देशित करीत आहे.

**अनुसूची-एक**

**जमीनीचे वर्णन**

**गावाचे नांव -मौजे वसगडे ता.करवीर,जि.कोल्हापूर.**

| अ. क्र. | भुमापन किंवा गट क्रमांक | अंदाजित क्षेत्र (हे.आर) | दिशा (चतु:सिमा) | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | पूर्व | पश्चिम | दक्षिण | उत्तर |
| १ | १२०३ पै | ०.०३ | १२०१ | १२०७ | सांगवडे शिव | १२०६ |
| २ | १२०५ पै | ०.७२ | १२०६,१२०७, १२०८ | मुडशिंगी शिव | १२०४ | १२२७, १२२६, १२२५ |
| ३ | १२०६ पै | ०.१५ | १२०१ | १२०० | १२०३ | १२१०,१२१२ |
| ४ | १२०७ पै | ०.०४ | १२०६ | १२०५ | १२०६ | १२०६,१२१० |
| ५ | १२०८ पै | ०.२५ | १२०९, १२१०, १२२९, १२२२ | १२०५ | १२०६ | १२२३ |
| ६ | १२२३ पै | ०.०६ | १२३० | १२०५ | १२०८ | १२२८ |
| ७ | १२२४ पै | ०.०६ | १२२७ | १२०५ | १२२३ | १२२५ |
| ८ | १२२५ पै | ०.०३ | १२२६ | १२०५ | १२२४ | १२२६ |
| ९ | १२२६ पै | ०.०२ | १२२७ | १२०५ | १२२५ | १२२७ |
| १० | १२२७ पै | ०.०९ | १२३०, १२२९ | मुडशिंगी शिव | १२०५,१२२७ | १३५३,१३५८ |
| | एकूण | १.४५ | | | | |

## अनुसूची - दोन
### सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरूपाबाबत विवरण

**प्रकल्पाचे नांव:** दुधगंगा मोठा पाटबंधारे प्रकल्प,तालुका -राधानगरी, जिल्हा.कोल्हापूर

**प्रकल्पाचे कामाचे वर्णन:-** दुधगंगा मोठा पाटबंधारे प्रकल्प ता.राधानगरी जि.कोल्हापूर हा महाराष्ट्र व कर्नाटक या दोन राज्यातील आंतरराज्यीय प्रकल्प आहे. या प्रकल्पांतर्गत दुधगंगा नदीवर आसनगांव ता.राधानगरी येथील १२८० मी. लांबीचे (मध्यभागी नदीपात्रात दगडी व दोन्ही तिरावर मातीचे असे संयुक्त) धरण आहे. दुधगंगा धरणाखालील दोन्ही तिरावर कालवे असून सदर कालव्याची लांबी उजवा तीर कालवा २४ कि.मी.व उजवा तीर कालव्याखालील बिद्री शाखा कालवा ४१ कि.मी., निढोरी शाखा कालवा २५ कि.मी., कूर शाखा कालवा १७ कि.मी.,डावा तीर कालवा ७६ कि.मी., डाव्या तीर कालव्याखालील कोल्हापूर शाखा कालवा ३८ किमी व कुरुंदवाड शाखा कालवा ४० कि.मी. इतकी आहे.

सदर धरणामध्ये ७१९.९२ दलघमी इतका पाणीसाठा होत असून त्यामुळे महाराष्ट्र राज्यातील ६१०३२ हे.(पीकक्षेत्र) व कर्नाटक राज्यातील १२९८५ हे.(पीकक्षेत्र) क्षेत्रास सिंचनाचा लाभ होणार आहे. सदर प्रकल्पास तृतीय प्रशासकीय मान्यता रु.१७१२७९.९० लक्ष दिनांक १५ जुलै २०११ अन्वये मंजूरी प्राप्त झालेली आहे. आतापर्यंत सदर प्रकल्पास रु.९९६६३.०० लक्ष इतका खर्च झालेला आहे. सदर प्रकल्पाची उर्वरित किंमत रु.७१६१६.९० लक्ष इतकी आहे.त्यामुळे सद्य:स्थितीत सदर प्रकल्पास अनुदान उपलब्ध आहे.

**समाजाला होणारे लाभ :-**

अ) या प्रकल्पामुळे प्रकल्पाच्या लाभक्षेत्रामध्ये बारमाही पाण्याची सोय झाल्यामुळे नगदी पिके घेणे शक्य होवून लोकांचा आर्थिक व सामाजिक स्तर विकसीत झाला असून दिवसोदिवस सदर विकास वाढतच आहे. तसेच या प्रकल्पामुळे लाभक्षेत्रातील गांवामध्ये पाणीटंचाई दूर झालेली आहे.

ब) प्रकल्पाच्या लाभक्षेत्रातील पीक क्षेत्रामध्ये वाढ झालेली असून त्यामुळे स्थानिक लोकांना रोजगार मिळालेला आहे.

क) पुरेशा प्रमाणात पाणी उपलब्ध झाल्यामुळे विविध प्रकारची नगदी पिके घेणे शक्य होवून लाभक्षेत्रातील शेतक-यांचे आर्थिक राहणीमान सुधारल्यामुळे ते लोक सर्व नागरी सुविधा मिळविण्याबाबत सक्षम झालेले आहेत.

ड) प्रकल्पाच्या लाभक्षेत्रामध्ये ऊसासारखी नगदी पिके घेतल्यामुळे साखर कारखान्यासारखा औद्यौगिक क्षेत्रामध्ये वाढ होवून विकास झालेला आहे.

## अनुसूची -तीन
### बाधित व्यक्तीचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे

मौजे.वसगडे, ता.करवीर जि.कोल्हापूर येथील जमीनी दूधगंगा डावा कालवा अंतर्गत कोल्हापूर शाखा कालवा कि.मी. १८ ते १९ च्या बांधकामासाठी संपादित करावयाच्या सदर क्षेत्रामध्ये फक्त शेत जमीन येत असुन, गावठाणे विस्थापित होत नाही. सबब विस्थापितांचे पुनर्वसन करण्याची आवश्यकता नाही.

## अनुसूची - चार
### (सामाजिक प्रभाव निर्धारण अभ्यास करण्या-या अभिकरणाने दिलेला)
### (सामाजिक प्रभाव निर्धारणाचा सारांश)

दुधगंगा हा महाराष्ट्र व कर्नाटक या दोन राज्यातील आंतरराज्यीय प्रकल्प आहे. या सदर प्रकल्पाचा नियत दिनांक २ नोव्हेंबर १९७८ हा आहे. दूधगंगा आंतरराज्य प्रकल्पास मा.भारत सरकारच्या पर्यावरण व वन मंत्रालय यांचे पत्र क्रमांक G-221/92 FC, दिनांक १६ नोव्हेंबर १९९४ अन्वये तसेच मा.भारत सकरकाच्या पर्यावरण व वन खात्याची त्यांचे पत्र क्रमांक Bo/Bo/Env-5 दिनांक २ जानेवारी १९८४ अन्वये पर्यावरण व वन खात्याची मान्यता प्राप्त झालेली आहे. तसेच सदर दोन्ही आदेशान्वये अतिरिक्त संचालक मा.भारत सरकारच्या पर्यावरण व वन मंत्रालय यांचे पत्र क्रमांक १२००११/ संकीर्ण/ A-१, दिनांक ७ फेब्रुवारी २००८ अन्वये मा.भारत सरकारच्या दिनांक २ जानेवारी १९८४ व १६ नोव्हेंबर १९९४ च्या आदेशान्वये पर्यावरण व वनजमिनीस दिलेल्या मान्यतांचे विषद करुन संदर्भीय पत्रान्वये कळविले आहे. सदर प्रकल्पांस मा.भारत सरकारच्या पर्यावरण व वन विभागाची मान्यता प्राप्त आहे. तसेच सदर दूधगगा प्रकल्पांतील प्रकल्पग्रस्तांना देय असलेल्या पर्यायी जमीन वाटपाची कार्यवाहीही पूर्ण झालेली आहे. सदर प्रकल्प ग्रामीण पायाभूत सुविधा अंतर्गत आहे. नवीन भूसंपादन अधिनियम २०१३ नुसार सदर प्रकल्पास सुधारित **सामाजिक प्रभाव निर्धारण** करणे आवश्यक नाही.

## अनुसूची - पांच
### नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशिल

अ) प्रशासक म्हणुन नियुक्त करण्यात आलेल्या अधिकाऱ्यांचे पदनाम : लागू नाही

ब) प्रशासनाच्या कार्यालयाचा पत्ता : प्रश्न उदभवत नाही

क) ज्या अधिसुचनेद्वारे प्रशासकाची नियुक्ती करण्यात आली आहे त्या अधिसूचनेचा तपशिल. : प्रश्न उदभवत नाही

**टीप - उक्त जमिनीच्या आराखडयांची उपविभागीय अधिकारी, करवीर विभाग, कोल्हापूर या कार्यालयात निरीक्षण करता येईल.**

दिनांक : 03/08/2019 /०८/२०१९

ठिकाण : कोल्हापूर

**(सचिन इथापे)**
**उपविभागीय अधिकारी,**
**करवीर विभाग , कोल्हापूर**

उपविभागीय अधिकारी करवीर विभाग, कोल्हापूर सत्यमेव जयते

**(दौलत देसाई)**
**जिल्हाधिकारी, कोल्हापूर**